# महाराष्ट्र दिन-अहवाल

### ०१ मे २०२५

## जय जय महाराष्ट्र देशा





महाराष्ट्र दिन आमच्या शाळेत अगदी उत्साहात साजरा झाला. शाळेच्या प्रत्येक कोपऱ्यातून महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा सगळेजण उत्साहात आणि गर्वाने देत होते. आपल्या भारत देशाच्या विकासामध्ये महाराष्ट्रीयन संस्कृती आणि वारसा जपण्यासाठी डी. ए. व्ही पब्लिक स्कूल ठाणे यांनी महाराष्ट्र दिन साजरा करून आपला सहभाग दर्शविला.



शाळेचे प्रांगण सुशोभीत करण्यात आले होते. बऱ्याच विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा केली होती. महाराष्ट्रीयन भगवा फेटा परिधान केला होता. शाळेत या दिवशी काही उपक्रम राबवण्यात आले. छोट्या नाटुकली, महाराष्ट्रीयन नृत्याचे प्रकार, मराठीतून सुंदर घोषवाक्य तसेच महाराष्ट्रातील मराठी लोकगीते सादर करण्यात मुलांनी मधल्या सुट्टीत खाण्यासाठी महाराष्ट्रीयन पदार्थ आणले होते व एकत्र बसून खाल्ले. मराठी गाणी मुलांनी वर्गामध्ये गायली. महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध समाज सुधारक व व्यक्तींच्या बद्दल मराठीतून भाषणे दिली. महाराष्ट्राच्या दिनाबद्दल विद्यार्थी भाषणातून बोलले.





मराठीचा वारसा आणि संस्कृती जतन करताना संगीताच्या शिक्षकांनी मुलांकडून मराठी गाणी सुंदर रित्या म्हणून घेतली. मुलांना एकत्र संगीताच्या तालावर नृत्य करण्यास प्रवृत्त केले ,मार्गदर्शन केले. मुलांनी महाराष्ट्रीय संगीताच्या तालावर गाण्यांवर नृत्य केले. त्यावेळी शाळेत सगळीकडे महाराष्ट्रीयन झेंडे लावले असल्याने सगळे वातावरण मराठी होऊन गेले आनंदी झाले आणि अशा प्रकारे हा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात यशस्वीरित्या साजरा झाला.